दि. ०२/०४/२०२६

प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लातुर. |
| २. | पोलीस स्टेशन | उदगीर ग्रामीण, ता.उदगीर जि. लातुर |
| ३. | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये |
| ४. | तक्रारदार | पुरूष, वय ४३ वर्षे, रा. क्रिस्टल पार्क बिल्डिंग, बी विंग, फ्लॅट नंबर ४०२ फुगे नगर ,हडपसर,पुणे |
| ५. | फिर्यादी :- सरकारतर्फे | संतोष धनसिंग वर्गे, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि., लातूर |
| ६ | आरोपी लोकसेवक | १) राहुल बाबूराव नागरगोजे, पद – पोह/१३३७ ने. उदगीर शहर जि. लातूर गट– क, रा. सोनवळा ता.उदगीर<br>२) राजकुमार पुजारी, वय ४४ वर्षे पद– पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे उदगीर (ग्रामीण ) जि. लातूर ,गट – अ, रा.भीमनगर, नळदुर्ग ता. तुळजापुर जि. धाराशिव हा.मु. नंदनवन कॉलनी, फ्लॅट क्र.३०४, मधुबन सोसायटीच्या जवळ, लातुर. |
| ७. | गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाण | दि. ०२/०४/२०२६ रोजी १४:०७ वा. दरम्यान पंचवटी हॉटेल समोर अहमदपूर रोड, उदगीर जि. लातूर. |
| ९. | मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/– रू. |
| १०. | स्विकारलेली लाचेची रक्कम | ४५,०००/– |
| ११ | थोडक्यात हकिकत :– यातील तक्रारदाराचे मेव्हणे रणजीत मल्हारी पाटील यांचे विरुद्ध दि.३१/३/२०२६ रोजी पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे गुरन १६२/२०२६ कलम ७६,३५१(२),३५२ बीएनएनएस अन्वये गुन्हा नोंद आहे. आरोपी क्रमांक १ व २ हे तक्रारदार यांना त्यांचे मेव्हण्या विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्याचे तपासात अटक न करण्यासाठी व इतर मदत करण्यासाठी ३००,००० रुपये लाच मागणी करत असल्याची तक्रार दि. ०१/०४/२०२६ रोजी ला.प्र.वि.,लातूर येथे प्राप्त झाली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने आरोपी क्रमांक १ व २ यांची दिनांक ०२/०४/२६ रोजी तक्रारदाराकरवी लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी क्रमांक १ यांनी आरोपी क्रमांक २ यांचे सांगण्यावरून आरोपी क्रमांक २ यांचे करिता पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे पंचासमक्ष ५०,००० रुपये लाचेची मागणी केली.<br>दि. ०२/०४/२०२६ रोजी सापळा कार्यवाही आजमावली असता आरोपी क्रमांक १ याने आरोपी क्रमांक २ चे वतीने तक्रारदार यांच्या कडून ४५,०००/– रू लाच रक्कम हॉटेल पंचवटी समोर, अहमदपूर रोड, उदगीर येथे पंचासमक्ष स्वत: स्वीकारली आहे. लाच रक्कम स्विकारल्यानंतर आरोपी क्रमांक १ यांनी आरोपी क्रमांक २ यांना तक्रारदार यांचे समक्ष फोन करून तक्रारदारास भेटल्याची माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार हे आरोपी क्रमांक १ यांचे फोन वरुन आरोपी क्रमांक २ यांचेसोबत फोन वर बोलले असता आरोपी क्रमांक २ यांनी "पाठवून द्या ना काय काय दयायचे तुम्हाला मदत करता येईल आम्हाला" असे म्हणून लाच मिळविण्याचे प्रयत्न करून आरोपी क्रमांक १ यांचे करवी लाच स्विकारली आहे<br>आरोपी लोकसेवक क्र. १) राहुल बाबूराव नागरगोजे पद – पोह.१३३७ ने. उदगीर शहर जि. लातूर गट– क, आरोपी लोकसेवक क्र.२) राजकुमार पुजारी, वय ५२ वर्षे पद– पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे उदगीर (ग्रामीण ) जि. लातूर ,गट – अ यांचेविरूध्द पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण, जि.लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८.अन्वये गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास विशाल वहात्तरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. लातूर हे करीत आहेत. | |

सदर सापळा कार्यवाही मा. श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री. अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, यांचे मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक संतोष वर्गे, पोलीस निरीक्षक जगदीश राऊत, पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे, पोह/दामटे, पोह/कठारे, पोह/भिमराव आलुरे, पोह/शाम गिरी, पोकॉ/मंगेश कोंडरे, पोकॉ/दिपक कलवले, पोकॉ/किरण गंभीरे, चापोह/संतोष क्षिरसागर, पोकॉ/गजानन जाधव, पोकॉ/शिवराज गायकवाड, पोका/असलम सय्यद, मपोकॉ/शाहाजान पठाण, मपोकॉ/परवीन तांबोळी यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक | :– | ०२४६२–२५५८११ मोबाईल क्रमांक –९२२६४८४६९९ |
| २) | श्री. अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक | :– | ०२४६२–२५५८११ |
| ३) | श्री. संतोष वर्गे, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक –९२२६२०१०६४ |
| ४) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ५) | ला.प्र.वि.,लातुर कार्यालय फोन क्रमांक | :– | ०२३८२–२४२६७४ |
| ६) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ७) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ८) | Facebook Page | :– | www.facebook.com/maharashtraACB |
| ९) | 8 Twitter | :– | ACBlatur |
| १०) | Instagram | :– | Acblatur |
| ११) | YouTube Channel | :– | anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर
सत्यमेव जयते

(संतोष ध.वर्गे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with OKEN Scanner